

पुणे : ससून रुग्णालयात सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभारलेल्या अर्भक अतिदक्षता विभागाचे लोकार्पण रविवारी करण्यात आले. त्या वेळी (डावीकडून) मुक्ता टिळक, दिलीप कांबळे, अनिल शिरोळे, गिरीश महाजन, गिरीश बापट, प्रकाश छाब्रिया, रितू छाब्रिया, हेमंत रासने, अशोक गोडसे.

# महाविद्यालयांत 'एनआयसीयू' राबवू

## गिरीश महाजन यांचे आश्वासन; ससूनमध्ये प्रकल्पाचे लोकार्पण

**पुणे, ता. १६ :** ''ससून रुग्णालयात सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभारलेल्या अर्भक अतिदक्षता विभागाचा (एनआयसीयू) प्रकल्प राज्यातील इतर सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी पथदर्शी आहे. त्यामुळे राज्यातील इतर वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये असे प्रकल्प राबविण्यात यावेत, अशा सूचना सर्व अधिष्ठात्यांना देण्यात येतील,'' असे राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी (ता. १६) येथे सांगितले.

फिनोलेक्स प्रायव्हेट लिमिटेड व त्याच्याशी संलग्न मुकुल माधव फाउंडेशन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, कमिन्स इंडिया, सुझलॉन एनर्जी, सिसका एलईडी या कंपन्यांनी दिलेल्या देणगीतून ससून रुग्णालयात ५९ खाटांचा 'एनआयसीयू' साकारला आहे. यासाठी अकरा कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण करण्यात आले. त्या वेळी महाजन बोलत होते. महापौर मुक्ता टिळक, खासदार अनिल शिरोळे, पालकमंत्री गिरीश बापट, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालक रितू छाब्रिया, फिनोलेक्स उद्योगाचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीक्षक डॉ. अजय चंदनवाले आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे या वेळी उपस्थित होते.

महाजन म्हणाले, ''समाजातील दानशूर व्यक्तींनी आरोग्यसेवेला मदत करण्यासाठी प्राधान्य द्यावे. उद्योगांनी सामाजिक जबाबदारीचा (सीएसआर) निधी देताना शिक्षणाबरोबरच आरोग्याचाही विचार करण्याची गरज आहे. त्यातून समाजातील सामान्य रुग्णांना सरकारी रुग्णालयांत अद्ययावत वैद्यकीय सुविधा मिळतील.''

बापट म्हणाले, ''गरीब रुग्ण केंद्रबिंदू मानून ससून रुग्णालयातील डॉक्टर रुग्णसेवा देत आहेत. हा 'ससून पॅटर्न' राज्यात सर्वत्र वापरला जावा, अशी माझी अपेक्षा आहे.''

शिरोळे म्हणाले, ''ससून रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर टीका करताना सकारात्मक बाबीसमोर आणण्याचा अभ्यागत मंडळाचा नेहमीच उद्देश राहिला आहे.''

डॉ. चंदनवाले म्हणाले, ''मध्यमवर्गीयांसाठी ससून रुग्णालयातील सेवा सक्षम करण्यासाठी पावले उचलत आहेत. येथे येणाऱ्या रुग्णांना मोठ्या रुग्णालयांप्रमाणे सुविधा देणे, हा या सुविधेमागील मुख्य उद्देश आहे.'' कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. महेश सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले.